महाराष्ट्र पोलीस

सुरक्षा शाखा, ठाणे ग्रामीण

Security Branch, Thane Rural

पत्ता :- दुसरा मजला, पोलीस अधीक्षक कार्यालय, एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग,कोर्ट नाका, खारकर आळी, ठाणे पोलीस स्कुल समोर, ठाणे-४०१ ६०१, दुरध्वनी क्रमांक -०२२ २५४१३०५३

E-Mail ID : security.thane.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.:सुशा/आपत्ती व्यवस्थापन अधिनियमप्रमाणे कारवाई/फटाके बंदी/ ४७१ /२०२६ दि.०९/११/२०२६

प्रति,

सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, ठाणे ग्रामीण
सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी,

विषय :- ठाणे जिल्हयातील फटाक्यामुळे आगीच्या वाढत्या दुर्घटना लक्षात घेता रॉकेट व तत्सम फटाक्यावर कायदेशीर प्रतिबंध घालणे आवश्यक झाले आहे. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्रानुसार आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ चे कलम २६ (२),कलम ३० व कलम ३४ (म) प्रमाणे कारवाई करावी. तसेच सदर आदेशाचे पालन करण्यास नकार देण्या-या विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ चे कलम ५१ व ६० मधील तरतुदीनुसार तात्काळ कारवाई करावी. केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र. सामान्य / आपत्ती/फटाके बंदी/कावि-११/२०२६ दि.०९/११/२०२६ अन्वये

-------oooooooooo--------

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. सामान्य /आपत्ती/फटाके बंदी/कावि-११/२०२६ दि.०९/११/२०२६ अन्वये पत्र प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांनी सदर पत्रात खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत. ठाणे ग्रामीण जिल्हयामध्ये आजमितीस एकुण वेगवेगळया ठिकाणी आगीच्या घटना निर्दशनास आल्या आहेत. यामध्ये मोठया प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी मालमत्तेस नुकसान झाले असुन मानवी जिवीतास धोका निर्माण झाला आहे. तसेच काही नागरीकस हवेमध्ये उडणारे रॉकेट व तत्सम फटाके उडवत आहेत. काही नागरीक रॉकेट थेट हातात धरुन धोकादायक पध्दतीने उडवत असल्याचे निदर्शनास आले आहे. अश्या प्रकारच्या कृत्यामुळे आगीच्या दुर्घटनामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यतता नाकारता येत नाही. आगीच्या वाढत्या दुर्घटना लक्षात घेता जिल्हयात तात्काळ आपत्कालीन उपाययोजना करणे, रॉकेट व तत्सम फटाक्यावर कायदेशीर प्रतिबंध घालणे आवश्यक झाले आहे.

आणि ज्याअर्थी,अहवालात नमुद केल्यानुसार रॉकेट व हवेत उडणा-या फटाक्याचे जळते अवशेष निवासी इमारती व ज्वलनशिल साहीत्यावर पडुन आग लागण्याच्या आणि जिवीत व मालमत्तेची हानी होण्याचा तातडीचा धोका आहे. तसेच जिल्हयातील जोखीमस्थिती विचारात घेता संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी तातडीची प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, रहीवासी भागात, दाट लोकवस्तीच्या ठिकाणी, इमारती मधील रिफ्युज एरीया, वाहनतळ (पार्कीग) किंवा गच्ची (टेरेस) येथुन मोठया प्रमाणात रॉकेट, हवेत उडणारे फटाके

घटनांना प्रतिबंध करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करणे आवश्यक असल्याने मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ चे कलम २६ (२),कलम ३० व कलम ३४ (म) अन्वये पुढील आदेश दिले आहेत.

१)संपुर्ण ठाणे जिल्हयाच्या हद्दीत रॉकेट व तत्सम उडत्या फटाक्यांचा वापर करण्यास प्रतिबंध राहील.सदर प्रतिबंध सार्वजनिक व खाजगी जागा इमारतीच्या गच्च्या, बाल्कनी,आवारे आणि सर्व रहीवासी भागात लागु राहील.

२)सदर आदेश दि.०९/११/२०२६ रोजीचे ००.०१ ते दि.०८/०१/२०२७ रोजीचे २३.५९ पर्यत लागु राहील.

३)संबधीत पोलीस अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था व अग्निशमन विभाग यांनी आदेशाची अंमलबजावणी आणि व्यापक प्रसिध्दी करावी. गृहनिर्माण संस्थांनी आदेशाची माहीती सभासदांना दयावी.

४)सदर आदेशाचे पालन करण्यास नकार देण्या-या विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम ,२००५ चे कलम ५१ व ६० मधील तरतुदीनुसार कारवाई करावी.

५)इतर फटाक्यांचा वापर प्रचलित कायदे, सक्षम प्रधिकरणांचे आदेश व लागु न्यायालयीन निर्देशाच्या अधीन राहील.

सदरचा आदेश मा. श्री. डॉ. श्रीकांत पांचाळ जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचे स्वाक्षरीने व शिक्यानिशी आज दि.०९/११/२०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.तरी पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सदर आदेशाची तात्काळ व कठोर अंमलबजावणी करावी.

असे पत्र मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडुन प्राप्त झाले असुन फटाक्यामुळे आगीच्या वाढत्या दुर्घटना लक्षात घेता जिल्हयात तात्काळ आपत्कालीन उपाययोजना करणे,रॉकेट व तत्सम फटाक्यावर कायदेशीर प्रतिबंध घालणे आवश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, वरीलप्रमाणे दिलेल्या मुदयानुसार व आदेशाप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,२००५ चे कलम २६ (२),कलम ३० व कलम ३४ (म) प्रमाणे कारवाई करावी. तसेच सदर आदेशाचे पालन करण्यास नकार देण्या-या विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम ,२००५ चे कलम ५१ व ६० मधील तरतुदीनुसार तात्काळ कारवाई करावी. केलेल्या कारवाईचा अहवाल इकडील कार्यालयात सादर करावा. यासोबत मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,ठाणे यांचेकडील पत्र जोडीत आहोत.

तसेच प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, ठाणे यांचेकडील प्राप्त पत्रातील मुददा क्र.०३ प्रमाणे संबधीत पोलीस अधिकारी, यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी आणि व्यापक प्रसिध्दी करणे बाबत कळविण्यात आले आहे.तरी सदरची माहीतीचे पत्र नागरीकापर्यत पोहचण्याकरीता ठाणे ग्रामीण वेब साईड, इस्टाग्राम, व सोशल मिडीयावर, फेसबुक, ट्विटर या सोशल मिडीयावर प्रसारीत करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सुरक्षा शाखा येथे न चुकता सादर करावा.

(अनमोल मित्तल)
अपर पोलीस अधिक्षक,
अति. कार्य.पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे यांचे कार्यालय

पत्ता :- २ रा मजला, सामान्य शाखा, जिल्हा व सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
ई-मेल :- gbthane@gmail.com

वाचले :-

१. मुख्य अग्निशमन अधिकारी, ठाणे मनपा दिनांक ८/११/२०२६ च्या घटनेबाबत दूरध्वनी संदेश
२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा दिनांक ०८/११/२०२६ रोजीचा प्राथमिक अहवाल.
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम २६ (२), कलम ३० व कलम ३४ (म)
४. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३

क्रमांक/सामान्य/आपत्ती/फटाके बंदी/कावि-११/२०२६ दिनांक ०९/११/२०२६

आदेश :-

ज्याअर्थी, उपरोक्त अहवालांद्वारे ठाणे जिल्ह्यामध्ये आजमितीस एकूण ११ वेगवेगळ्या ठिकाणी आगीच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे नुकसान झाले असून मानवी जीवितास धोका निर्माण झाला आहे. तसेच, काही नागरिक हवेमध्ये उडणारे रॉकेट व तत्सम फटाके उडवत आहेत. काही नागरिक रॉकेट थेट हातात धरून धोकादायक पद्धतीने उडवत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारच्या कृत्यामुळे आगीच्या दुर्घटनांमध्ये आणखी वाढ होण्याची आणि कायदा व सुव्यवस्थेची तसेच सार्वजनिक सुरक्षेची गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आगीच्या वाढत्या दुर्घटना लक्षात घेता जिल्ह्यात तात्काळ आपत्कालीन उपाययोजना करणे, रॉकेट व तत्सम फटाक्यांवर कायदेशीर प्रतिबंध घालणे अत्यंत आवश्यक झाले आहे;

आणि ज्याअर्थी, अहवालांमध्ये नमूद केल्यानुसार रॉकेट व हवेत उडणाऱ्या फटाक्यांचे जळते अवशेष निवासी इमारती व ज्वलनशील साहित्यावर पडून आग लागण्याचा आणि जीवित व मालमत्तेची हानी होण्याचा तातडीचा धोका आहे. तसेच, जिल्ह्यातील जोखीमस्थिती विचारात घेता संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी तातडीची प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, रहिवासी भागांत, दाट लोकवस्तीच्या ठिकाणी, इमारतींमधील रिफ्यूज एरिया, वाहनतळ (पार्किंग) किंवा गच्ची (टेरेस) येथून मोठ्या प्रमाणात रॉकेट, हवेत उडणारे फटाके व तत्सम फटाके उडविले जात असल्याचे तसेच अशा फटाक्यांमुळे इमारतींना आग लागण्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित करणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झाली आहे;

त्याअर्थी, मी, डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम २६ (२), कलम ३० व कलम ३४ (म) अन्वये पुढील आदेश देत आहे.

१. संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या हद्दीत रॉकेट व तत्सम उडत्या फटाक्यांचा वापर करण्यास प्रतिबंध राहील. सदर प्रतिबंध सार्वजनिक व खासगी जागा, इमारतींच्या गच्च्या, बाल्कनी, आवारे आणि सर्व रहिवासी भागांत लागू राहील.
२. सदर आदेश **दिनांक ०९/११/२०२६ रोजीचे ००.०१ ते दिनांक ०८/०१/२०२७ रोजीचे २३.५९ पर्यंत** लागू राहील.
३. संबंधित पोलीस अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था व अग्निशमन विभाग यांनी आदेशाची अंमलबजावणी आणि व्यापक प्रसिद्धी करावी. गृहनिर्माण संस्थांनी आदेशाची माहिती सभासदांना द्यावी.
४. सदर आदेशाचे पालन करण्यास नकार देणाऱ्यांविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ व ६० मधील तरतुदींनुसार कारवाई करावी.

आवक क्र. ४०८/२०२६
सुरक्षा शाखा, ठाणे ग्रामीण
दिनांक:- ९/११/२०२५

पोलीस निरीक्षक
सुरक्षा शाखा, ठाणे ग्रामीण

५. **इतर फटाक्यांचा वापर प्रचलित कायदे, सक्षम प्राधिकरणांचे आदेश व लागू न्यायालयीन निर्देशांच्या अधीन राहील.**

सदर आदेश आज दिनांक ०९/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने व शिक्यानिशी जारी करण्यात येत आहे. पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सदर आदेशाची तात्काळ व कठोर अंमलबजावणी करावी.

(डॉ. श्रीकृष्ण पांचाळ)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे

प्रति,

१. पोलीस आयुक्त, ठाणे शहर / नवी मुंबई / मिरा-भाईंदर वसई-विरार
२. आयुक्त, ठाणे / नवी मुंबई / कल्याण डोंबिवली / मिरा-भाईंदर / उल्हासनगर / भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
३. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
५. उपविभागीय अधिकारी (सर्व ठाणे जिल्हा)
६. तहसीलदार (सर्व ठाणे जिल्हा)
७. मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती (सर्व ठाणे जिल्हा)
८. मुख्य अग्निशमन अधिकारी, मनपा (सर्व ठाणे जिल्हा)
९. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, ठाणे
१०. जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

जिल्हा दंडाधिकारी जिल्हा ठाणे

(डॉ. श्रीकृष्ण पांचाळ)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे